**मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ याच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद अति-प्रदूषित क्षेत्रातील सर्वंकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) कालबध्द कार्यक्रमाबाबतची दि.१४/०६/२०१७ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे झालेल्या पर्यावरण कृती आराखडा आढावा बैठकीचे इतिवृत.**

---------------

मा.सदस्य सचिव,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०१७ रोजी मंडळाच्या मुख्यालयात औरंगाबाद अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत उपस्थित असलेल्या अधिकारी व उद्योगांचे प्रतिनिधी तसेच शासकीय अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

आढावा बैठकीच्या प्रस्तावनेबाबत नमूद करताना सह-संचालक(हप्रनि) यांनी मंडळाने निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने कृती आराखडयामध्ये अल्प व दीर्घ मुदतीत प्रदूषण निर्देशांक कमी करण्याबाबतच्या उपाययोजनांचा समावेश आहे व संबंधित उपाययोजनेबाबत प्रभावी अंमलबजावणीची सद्य:स्थितीबाबत आढावा बैठक घेण्यात येत आहे. तसेच सह-संचालक(हप्रनि) यांनी कृती आराखडयाबाबतचा अहवाल विस्तृतपणे सादर करण्यात आला.

सदर निर्देशांक कमी करण्यासाठी म.प्र.नि.मंडळाने तयार केलेल्या कृती आराखडयाबाबत पाठपुरावा करुन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या हवा,जल व भूमीमध्ये झालेल्या प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी उद्योगाकडून वेळोवेळी भेटी देऊन, सदर उपाययोजनेबाबत पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

मागील आढावा बैठकीच्या इतिवृत्तानुसार मा.सदस्य सचिव यांनी संबंधित विभागाशी विचारणा करुन बैठकीत उपस्थित झालेल्या मुद्दानुसार केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला.

बैठकीस उपस्थित असलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रतिनिधी यांना शहरातून निर्माण होणा-या जल व घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट संबंधिची सद्य:स्थिती तसेच प्रस्तावित कामासंदर्भात विचारणा केली.

यावर औरंगाबाद महानगरपालिका प्रतीनिधी यांनी असे सांगितले की, झाल्टा व कांचनवाडी येथील सांडपाणी प्रक्रीया यंत्रणेचे जवळपास ८० टक्के काम पूर्ण झालेले आहे व उर्वरित काम तीन ते चार महिन्यांमध्ये पूर्ण होइल.

औद्योगीक वसाहत वाळूज औरंगाबाद येथे भूजल गुणवत्ता सुधारणे करीता कार्यान्वित करण्यात आलेल्या प्रायोगिक तत्वावरील प्रकल्पांमध्ये सुधारणा/बदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी स्तरावरील समितीकडे सादर करावा. अस्तित्वात असलेल्या Pilot plant प्रक्रिया TDS घटकाची मात्रा वाढत असल्यामुळे नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर करून TDS चे प्रमाण कमी करण्यात यश आलेले आहे. याकरीता M.S.Baroda University कडे याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

मा.सदस्य सचिव यांनी शेंद्रा औद्योगिक वसाहतीत प्रस्तावित असलेल्या घातक घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट सामुहिक केंद्र हे नवीन विकसित होणा-या बिडकीन औद्योगिक वसाहतीच्या पहिल्या टप्प्यामध्ये करुन घेण्याबाबत महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांना सांगितले. तसेच औरंगाबाद विभागास दिलेल्या १० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्तीबाबत सांगितले.

...२/-

मा.सदस्य सचिव यांनी उद्योगांच्या संमतीपत्रांच्या नुतनीकरणाच्या वेळी संबंधित उद्योगाकडून केलेल्या वृक्ष लागवडीबाबत व तसेच पावसाच्या पाण्याची साठवणुक करण्याबाबतची उपाययोजना यांची पुर्तता केली असल्याचे कळविण्यात यावे व त्यानुसार संमतीपत्र प्रदान करण्यात यावे.

मा.सदस्य सचिव यांनी निर्देशांक कमी करण्यासाठी निगडित असलेल्या विभागांची कृती आराखडयाबाबतच्या उपाययोजनेंची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी व उपस्थित झालेल्या मुद्दांबाबत कार्यवाहीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अनु.क्र. | उपस्थित केलेले मुद्दे | कार्यवाही | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १. | म.औ.वि.महामंडळ, वाळुज येथे असलेला पाझर तलाव पूर्णपणे निकामी करण्याबाबत | म.औ.वि.महामंडळ, वाळुज येथे असलेल्या पाझर तलाव पूर्णपणे निकामी करण्यात यावा. | जल सिंचन विभाग |
| २. | औरंगाबाद शहरातून निर्माण होणा-या जल प्रक्रिया विल्हेवाट केंद्राबाबत प्रस्तावित उपाययोजना | औरंगाबाद महानगरपालिका प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, झाल्टा व कांचनवाडी येथील सांडपाणी प्रक्रीया यंत्रणेचे जवळपास ८० टक्के काम पूर्ण झालेले आहे व उर्वरित काम तीन ते चार महिन्यांमध्ये पूर्ण होइल. सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे काम विहित मर्यादेत पूर्ण न झाल्यास महानगरपालिकेच्या महापौर तसेच आयुक्त यांच्यावर खटले दाखल करण्यात येतील,असे बजाविण्यात आले. | महानगरपालिका /म.प्र.नि.मंडळ |
| ३. | औरंगाबाद शहरातून निर्माण होणा-या घनकचरा प्रक्रिया विल्हेवाट केंद्राबाबत प्रस्तावित उपाययोजना | महानगरपालिकेतर्फे शहरात निर्माण होणारा घनकचरा जमा करुन, नारेगाव येथे टाकण्यात येते. परंतु महानगरपालिकेतर्फे सदर कच-याचे योग्य रितीने विल्हेवाट लावण्याकरिता प्रक्रिया संयंत्रणा उभारली नसल्याचे सांगण्यात आले.<br>महानगरपालिकेला शहरात निर्माण होणारा घनकच-यावर योग्य रितीने प्रक्रिया करुन, विल्हेवाट लावण्याबाबतचा अहवाल एक महिन्यात देण्याबाबत सांगण्यात आले. | महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | १७ वर्गवारीमध्ये येत असलेल्या उद्योगामध्ये ऑन लाईन मॉनिटरींग संयंत्रणा बसवून ती यंत्रणा म.प्र.नि.मंडळाच्या संकेतस्थळाशी जोडणे | ऑन लाईन मॉनिटरींग संयंत्रणा संबंधित उद्योगानी १५ दिवसामध्ये म.प्र.नि.मंडळाच्या संकेतस्थळाशी जोडावे. तसे न केल्यास प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद यांनी संबंधित उद्योगांना निर्देश देण्याचे आदेश देण्यात आले. | संबंधित उद्योग/ म.प्र.नि.मंडळ |
| ५. | शहरातील व औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण/डांबरीकरण व दुरुस्ती करताना उडणा-या धुळीच्या प्रदूषणावर उपाययोजना करण्याबाबत | महानगरपालिकेने प्रक्रियाकृत घरगुती सांडपाण्याचा वापर फवारा पध्दतीने किमान दिवसातून २-३ वेळा करावा, जेणे करुन उडणा-या धुळीवर नियंत्रण करता येईल, याबाबत म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे अहवाल सादर करावा. | महानगरपालिका/म.प्र.नि.मंडळ |
| ६. | औद्योगिक वसाहत वाळुज-औरंगाबाद येथे भूजल गुणवत्ता सुधारण्याकरिता कार्यान्वित असलेल्या प्रायोगिक तत्वावरील प्रकल्पामध्ये बदल करण्यासंबंधी | औद्योगिक वसाहत वाळुज येथे भूजल गुणवत्ता सुधारण्याकरिता कार्यान्वित असलेल्या प्रायोगिक तत्वावरील प्रकल्पामध्ये सद्य:परिस्थितीत Chromium या प्रमाणकाचे प्रमाण कमी झाल्याचे तसेच Total Dissolved Solid या प्रमाणकाचे प्रमाण कमी करण्याकरिता Softener लावण्याची गरज असल्याचे सुचविण्यात आले.<br>सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी स्तरावरील समितीकडे आवश्यक त्या मान्यतेसाठी १ महिन्यात सादर करावा असे सांगण्यात आले. | म.औ.वि.महामंडळ/ म.प्र.नि.मंडळ/जिल्हाधिकारी कार्यालय |
| ७. | पब्लिक ट्रान्सपोर्ट वाहनांमध्ये पर्यावरण पुरक इंधन (सीएनजी/ पीएनजी) वापर करणे | औरंगाबाद महानगरपालिकेअंतर्गत असणाऱ्या सर्व पब्लिक ट्रान्सपोर्ट वाहनांना पर्यावरण पुरक इंधन (सीएनजी/ पीएनजी) वापर करता येईल का, याबाबत जिल्हा प्रशासकीय विभागाने कार्यवाही करावी व पुढील २ महिन्यांत त्याबाबतचा अहवाल सादर करावा. | मा.जिल्हाधिकारी कार्यालय/ परिवहन विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | कोळश्यावर आधारित उद्योगांनी पर्यावरण पुरक इंधनाचा वापर करणेबाबत. | पर्यावरणपूरक इंधन (पीएनजी) चा वापर करणा-या उद्योगांची यादी तयार करुन, त्या उद्योगांच्या संमतीपत्रामध्ये सुधारणा करावी. तसेच कोळश्यावर आधारित उद्योगांची यादी करुन, त्यांना पर्यावरण पुरक इंधन (पीएनजी) चा वापर करणेबाबत आदेश देण्याचे व त्यासाठी एक वर्षाचा कार्यकाल निश्चित करुन त्यांनी केलेल्या कामाचा दरमाह अहवाल उप-प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले. | उद्योग/म.प्र.नि.मंडळ |
| ९. | नवीन सामुहिक घातक घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र उभारण्याबाबत | म.औ.वि.महामंडळाने सामुहिक घातक घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र उभारण्या, शेंद्रा औद्योगिक वसाहतीमध्ये जागा देण्यात आल्याचे सांगितले.<br>मा.सदस्य सचिव यांनी शेंद्रा औद्योगिक वसाहतीत प्रस्तावित असलेल्या घातक घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट सामुहिक केंद्र हे नवीन विकसित होणा-या बिडकीन औद्योगिक वसाहतीच्या पहिल्या टप्प्यामध्ये करुन घेण्याबाबत महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांना सांगितले. | उद्योग/म.प्र.नि.मंडळ |
| १० | वृक्षारोपन | वृक्षारोपन कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद यांना १० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले. | उद्योग/म.औ.वि.महामंडळ/ म.प्र.नि.मंडळ |

बैठकीस उपस्थितांचे आभार मानून आढावा बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**सह संचालक(हप्रनि)**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**सदस्य सचिव**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई